# मानसशास्त्रातील करिअर या विषयावर पोस्टर प्रदर्शन




मानसशास्त्रातील करिअर या विषयावरील पोस्टर प्रदर्शन प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. बी. एन. रावण समवेत शिवाजीराव पाटील, मा. राजेंद्र पाटील, प्रा.जगदीश सरदेसाई, डॉ. एन. डी. मांगोरे व मान्यवर

आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसशास्त्रीय समुपदेशन ही शाखा खूप गरजेची आहे. शाळांमध्ये याची खूप गरज सध्या जाणवत आहे. विद्यार्थ्यांनी समुपदेशन मधील करिअर संधी समजून घेऊन चांगल्या प्रकारे आपले करिअर घडवावे. मानसशास्त्रामधील विविध शाखा समाजासाठी उपयोगी आहेत.त्याचे जतन व संवर्धन केले पाहिजे. आपल्या महाविद्यालयातील मानसशास्त्र शाखेचा उपयोग सर्व विद्यार्थ्यांनी करून घ्यावा, असे आवाहन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ. बी. एन. रावण यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, मानसशास्त्र विभाग व समुपदेशन समितीमार्फत मानसशास्त्रातील करियर या विषयावर आयोजित केलेल्या पोस्टर प्रदर्शन प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.बी.एन.रावण बोलत होते.

पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मा. राजेंद्र पाटील, मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. जगदीश सरदेसाई, डॉ. एन. डी. मांगोरे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अनुज्ञा चौगुले हीने केले आभार दिपाली कोरडे हीने मानले तर सूत्रसंचालन प्रशांत साळोखे याने केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक,विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.